आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२ मे २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेत सुमारे ९० टक्के विद्यार्थी उत्तीर्ण

- आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना संदेश पाठवण्याच्या प्रणालीची देशभरात यशस्वी चाचणी

- रिझर्व्ह बँकेच्या डेप्युटी गव्हर्नरपदी रोहित जैन तर प्रसारभारतीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ गीतकार प्रसुन जोशी यांची नियुक्ती

- छत्तीसगडमध्ये आय ई डी निकामी करताना झालेल्या स्फोटात ४ जवानांचा मृत्यू, एक जण जखमी

**आणि**

- आगामी महिला टी ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची घोषणा

**<><><><><>**

राज्य शिक्षण मंडळाने घेतलेल्या इयत्ता बारावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. त्याविषयी अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून ….

**व्हॉईस कास्ट -**

*(राज्य शिक्षण मंडळाच्या बारावीच्या परीक्षेत यंदा ८९ पूर्णांक ७९ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत, अशी माहिती राज्य शिक्षण मंडळाचे अध्यक्ष त्रिगुण कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली. यंदाही उत्तीर्णांमधे मुलींनी बाजी मारली असून त्यांचं प्रमाण मुलांपेक्षा ६ पूर्णांक ३५ शतांश टक्क्यांनी जास्त आहे. विभागीय मंडळांमधे कोकण विभागाने आघाडी घेतली आहे. तिथे सर्वाधिक ९४ पूर्णांक १४ शतांश टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. लातूर विभागीय मंडळात उत्तीर्णांचं प्रमाण सर्वात कमी ८४ पूर्णांक १४ शतांश टक्के इतकं आहे. उत्तीर्णांची इतर विभागातली टक्केवारी अशी आहे. ..*
*मुंबई - ९० पूर्णांक ८ शतांश, पुणे - ९१ पूर्णांक २५ शतांश, नाशिक- ९० पूर्णांक ७२ शतांश, कोल्हापूर - ८९ पूर्णांक ९७ शतांश, नागपूर- ८८ पूर्णांक ६७ शतांश, अमरावती ९० पूर्णांक ९२ शतांश, आणि छत्रपती संभाजीनगर- ८८ पूर्णांक ६८ शतांश*

*निकालानंतर विद्यार्थ्यांसाठी समुपदेशन सेवा मोफत उपलब्ध आहे. गुण पडताळणीसाठी उद्या तीन मे पासून येत्या १७ मे पर्यंत विद्यार्थ्यांना गुणपडताळणीसाठी अर्ज करता येतील. पुरवणी परीक्षेसाठी किंवा श्रेणी सुधार परीक्षेसाठीचं वेळापत्रक नंतर जाहीर करण्यात येईल असं मंडळाच्या पत्रकात म्हटलं आहे.)*

**<><><><><>**

आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांपर्यंत जलदगतीनं सुरक्षा आणि इशारा विषयक संदेश पोहचवण्यासाठी केंद्र सरकारनं मोबाइल ब्रॉडकास्ट या संदेश प्रसारण सुविधेचा आज प्रारंभ केला. याअंतर्गत सराव चाचणीचा भाग म्हणून संपूर्ण देशभरात एकाचवेळी नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर इंग्रजी आणि स्थानिक भाषेतून आपत्कालीन इशारा देणारे संदेश पाठवले गेले.

केंद्रीय दूरसंवाद विभागानं स्वदेशी तंत्रज्ञान वापरून ही सुविधा विकसित केली असल्याची माहिती केंद्रीय दूरसंवाद मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांनी दिली. हे संदेश म्हणजे सराव चाचणी असून, नागरिकांनी घाबरून जाऊ नये असंही त्यांनी म्हटलं आहे. भविष्यात कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत या सुविधेचा वापर करून नागरिकांना योग्य वेळेत, त्या ठिकाणच्या स्थानिक भाषांमध्ये संदेश पाठवले जातील असं त्यांनी सांगितलं. नागरिकांच्या सुरक्षेला बळकटी देणं तसंच आपत्कालीन परिस्थितीत जलदगतीनं माहिती पोहचवण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारनं टाकलेलं हे महत्त्वाचं पाऊल असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

भारतीय रिझर्व बँकेचे डेप्युटी गव्हर्नर म्हणून रोहीत जैन यांची नेमणूक झाली आहे. विद्यमान डेप्युटी गव्हर्नर टी रबिशंकर यांचा विस्तारित कार्यकाळ आज संपत असून त्यांच्या जागी जैन काम करतील. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने रोहित जैन यांच्या नेमणुकीला मान्यता दिली असून त्यांचा कार्यकाळ त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतर ३ वर्ष राहील. सध्या ते रिझर्व बँकेच्या कार्यकारी संचालक पदावर आहेत.

<><><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाने प्रसार भारतीच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ गीतकार प्रसून जोशी यांची नियुक्ती केली आहे. याआधी, त्यांनी केंद्रीय चित्रपट प्रमाणपत्र मंडळाच्या अध्यक्षपदाची धुरा सांभाळली आहे.

लोकप्रिय चित्रपट गीतं, जाहिरात मोहीमा आणि सामाजिक भान जोपासणारं कथाकथन या क्षेत्रात जोशी यांनी मुबलक काम केलं आहे. जोशी हे सर्जनशील कलावंत असून जाहिरात, साहित्य आणि चित्रपट क्षेत्रात जगभरात त्यांची प्रशंसा केली जाते अशा शब्दांत माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे.

<><><><><>

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीसाठी निवडणूक आयोगाने अतिरिक्त निरीक्षक आणि पोलीस अधिकाऱ्यांची नियुक्ती केली आहे. मतमोजणी निरीक्षकांच्या मदतीसाठी अतिरिक्त १६५ निरीक्षक तर मतमोजणी केंद्राच्या आसपास सुरक्षेसाठी ७७ अतिरिक्त पोलीस कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक अधिकारी, मतमोजणी करणारे कर्मचारी, उमेदवार आणि त्यांचे प्रतिनिधी यांची ओळखपत्रं ECI NET ॲपवर उपलब्ध करून दिले जाणार आहेत.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये कांकेर नारायणपूर जिल्ह्यांच्या सीमेजवळ झालेल्या आय ई डी स्फोटात सुरक्षा दलाचे चार जवान ठार तर एक जवान जखमी झाला. जिल्हा राखीव दलाचे जवान आय ई डी निकामी करण्याच्या मोहिमेवर असताना ही घटना घडली. भूसुरुंग शोध, परिसर तपास आणि शोध मोहीमा राबवण्यासाठी हे पथक तैनात केलं होतं. शरण आलेल्या माओवादी आणि इतर स्रोतांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे बस्तर क्षेत्रातून गेल्या काही महिन्यांत मोठ्या प्रमाणावर आय ई डी शोधून काढून निकामी केल्याची माहिती बस्तरचे पोलीस महासंचालक सुंदरराज पी यांनी दिली.

<><><><><>

होर्मुझची सामुद्रधुनी सुरक्षितपणे पार करण्यासाठी जहाज कंपन्यांनी इराणला शुल्क दिलं, तर त्यांच्यावर निर्बंध लादले जातील,असा इशारा अमेरिकेनं दिला आहे. त्यामुळे  जागतिक तेल वाहतुकीसाठी महत्वाच्या असलेल्या या जलमार्गावर नियंत्रण मिळवण्यासाठी दोन्ही देशांमध्ये सुरु असलेला तणाव आणखी वाढण्याची शक्यता निर्माण झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

<><><><><>

इस्रायलने दक्षिण लेबननवर केलेल्या हवाई हल्ल्यात सात जणांचा मृत्यू झाला, तर अनेक जण जखमी झाले आहेत.  १७ एप्रिलला शस्त्रसंधीची घोषणा होऊनही इस्रायल आणि हिजबोलाचे हल्ले प्रतिहल्ले सुरूच आहेत. गेल्या चोवीस तासात इस्रायलने लेबननवर ५० हवाई हल्ले केल्याचं इस्रायलचे लष्करी प्रवक्ते लेफ्टनंट कर्नल एला वावेया यांनी सांगितलं. तर लेबननमधल्या एका गावातल्या घरात दबा धरून बसलेल्या इस्रायली सैनिकांवर ड्रोनने हल्ला केल्याचं हिजबोलानं सांगितलं.

<><><><><>

केनियामध्ये, मुसळधार पावसामुळे अनेक भागात पूर आणि भूस्खलन झाल्यामुळे दहा जणांचा  मृत्यू झाला. एल्गेयो माराक्वेट काउंटीच्या काही भागांना भूस्खलनाचा फटका बसला. तर क्वाले काउंटी आणि किटुई काउंटीमधल्या दोन पुलांचं नुकसान झाल्याचं स्थानिक प्रशासनानं सांगितलं.

<><><><><>

आगामी महिला टी ट्वेन्टी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघाची आज घोषणा झाली. या संघात यष्टिरक्षक फलंदाज यास्तिका भाटिया हिनं पुनरागमन केलं असून, वेगवान गोलंदाज नंदिनी शर्मा या नव्या खेळाडूला संधी दिली गेली आहे. हरमनप्रीत कौर हीच्याकडे या संघाचं नेतृत्व असेल, तर स्मृती मानधना संघाची उपकर्णधार असेल. १५ सदस्यांच्या संघात या तिघींशिवाय

शेफाली वर्मा, जेमिमा रॉड्रिग्ज, भारती फुलमाळी, दीप्ती शर्मा, रिचा घोष, श्री चरणी, यास्तिका भाटिया, अरुंधती रेड्डी, रेणुका ठाकूर, क्रांती गौड, श्रेयंका पाटील आणि राधा यादव यांचाही समावेश आहे. भारताची अष्टपैलू खेळाडू अमनजोत कौर दुखापतग्रस्त असल्यानं तिची निवड होऊ शकली नाही. येत्या १२ जूनपासून इंग्लंड आणि वेल्स इथं यंदाची विश्वचषक स्पर्धा होईल. विश्वचषक स्पर्धेआधी भारत २८ मे पासून इंग्लंडविरुद्ध तीन सामन्यांची ट्वेन्टी ट्वेंटी क्रिकेट मालिका खेळणार आहे.

<><><><><>

डेन्मार्कमध्ये सुरु असलेल्या थॉमस चषक २०२६ बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्य फेरीत भारताच्या पुरुष संघाचा सामना फ्रान्स बरोबर होणार आहे. भारतानं उपांत्यपूर्व फेरीत काल चिनी तैपेई वर ३-० असा एकतर्फी विजय मिळवला. मात्र, भारताच्या लक्ष्य सेनला कोपराच्या दुखापतीमुळे  स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं असून त्याचे उर्वरित सामने किदम्बी श्रीकांत खेळणार आहे. उपांत्य फेरीतल्या प्रवेशामुळे भारताचं एक पदक निश्चित झालं आहे. याआधी, भारतानं २०२२ मध्ये थॉमस चषक स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं असून १९५२, १९५५ आणि १९७९ मध्ये या स्पर्धेच्या कांस्य पदकाला गवसणी घातली आहे.

<><><><><>

भारताला २०३६ च्या ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धाचं यजमानपद भूषवायचं असेल, तर त्यासाठी व्यापक प्रशासकीय आणि संरचनात्मक सुधारणा करणं गरजेचा असल्याचा संदेश आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीनं भारताला दिला असल्याचं आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेचे महासंचालक बेंजामिन कोहेन यांनी म्हटलं आहे. भारतात जेव्हा उत्तेजक द्रव्य चाचणी पथकं पोहोचतात, तेव्हा खेळाडूंना अशा चाचणी होणार असल्याची आगाऊ सूचना मिळते आणि खेळाडू तिथून पळ काढत

असल्याच्या अनेक तक्रारी असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. भारतातल्या उत्तेजक द्रव्य प्रतिबंधक यंत्रणा अपयशी ठरल्याचा संदेश जाऊ शकतो, या भितीपोटी आंतरराष्ट्रीय चाचणी संस्थेसारख्या स्वायत्त संस्थेसोबत काम करण्याबद्दल भारतातून काही प्रमाणात विरोध असल्याचा दावाही त्यांनी केला.

<><><><><>

आयपीएलमध्ये चेन्नई सूपर किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यातला सामना चेन्नईत सुरू आहे. या सामन्यात मुंबईनं नाणेफेक जिंकून पहिल्यांदा फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा मुंबईच्या ८ षटकात २ बाद ७० धावा झाल्या होत्या.

<><><><><>

यंदाच्या मे महिन्यात देशात उष्णतेची लाट राहण्याची शक्यता लक्षात घेता, या परिस्थितीत  नागरिकांनी घाबरून जाऊ नये असं आवाहन केंद्रीय भू-विज्ञान मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांनी केलं आहे. ते आज नवी दिल्लीत प्रसार माध्यमांना संबोधित करत होते. मे महिन्यात देशाच्या काही भागातलं तापमान सरासरीपेक्षा जास्त राहील, तर काही भागात उष्णतेची लाट राहील असा अंदाज असल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

<><><><><>

भारतीय स्टेट बँकेसह देशातल्या विविध बँकांची कोट्यावधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याच्या प्रकरणात फरार असलेल्या कमलेश पारेख याला भारतात आणण्यात सीबीआयला यश आलं आहे. सीबीआयनं पारेख याचं संयुक्त अरब अमिरातीमधून भारतात यशस्वी प्रत्यर्पण घडवून आणलं. पारेख १ मे रोजी दिल्लीत पोहोचल्यावर सीबीआयनं त्याला आपल्या ताब्यात घेतलं.

//<><><><><>//